पुढारी



कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेजमध्ये पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना डॉ. पी. एस. पाटील. शेजारी. डॉ. एम. सी. शेख, अॅड. वैभव पेडणेकर, डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य पी. बी. पाटील, अमित बाडकर, सुयोग हतकर आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# जीवनातील ध्येय गाठण्यासाठी संघर्ष करा : डॉ. पाटील

## शहाजी लॉ कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनात निश्चित केलेले ध्येय गाठण्यासाठी संघर्ष करा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील यांनी केले. शहाजी लॉ कॉलेजमध्ये आयोजित ९० व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दि कौन्सिल ऑफ एज्युकेशचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते.

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, शिक्षण घेत असताना आपण इतरांपेक्षा काही तरी वेगळे करण्याचा विचार केला पाहिजे. केवळ पदवी घेऊन आपल्या जीवनात यशस्वी होता येणार नाही. तर मिळणाऱ्या शिक्षणातून नावीन्याचा शोध घेण्याची गरज आहे. अनेक विद्यार्थी केवळ पदवी घेऊन समाधान मानतात. तर काहीजण संशोधनाची कास धरतात. विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी निवडलेले क्षेत्र हे आव्हानात्मक आहे. समाजातील वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहा, जास्तीत जास्त ज्ञान अवगत करण्यासाठी वाचन करा, जास्तीत जास्त लोकांशी संवाद साधा, तुमच्यातील गुणवत्ता सिद्ध करून नवीन आव्हानांना सामोरे जा. सुरुवातीला अपयश आले तरी चालेल; पण न खचता अपयशाला धैर्याने सामोरे गेल्यास यश तुमचेच असेल.

डॉ. मगदूम यांनी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. या बदलत्या तंत्राचा स्वीकार करून आपले ध्येय साध्य करा, असे सांगितले. यावेळी कला, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शैक्षणिक वर्षाचा आढावा प्रा.डॉ.एम.सी. शेख यांनी घेतला. स्वागत डॉ.एस.आर. रासम यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पी.बी.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अस्मिता पाटील यांनी, तर आभार स्टुडंट बार असोसिएशन अध्यक्ष सुयोग हतकर यांनी मानले. यावेळी अॅड. वैभव पेडणेकर, अॅड. अमित बाडकर व विद्यार्थी उपस्थित होते.

17 MAY 2023
पुढारी
अनपक्षक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बृहत् आराखड्यातील दोन महाविद्यालयाच्या बिंदूबाबत दुरुस्ती

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बृहत् आराखड्यात १९३ बिंदू आहेत. परंतु कागल व सातारा जिल्ह्यातील जैतापूर येथे अनावधाने बिंदू दोनवेळा टाकले होते. अधिष्ठातांच्या शिफारसीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बृहत् आराखड्यातील डबल झालेले दोन महाविद्यालयांच्या बिंदूमध्ये दुरुस्ती करण्यात आली.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या



अध्यक्षतेखाली झाली. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. विद्यापीठ बृहत् आराखड्यात कागलमध्ये व सातारा येथील जैतापूरमध्ये तीन कॉलेज १५ किलोमीटरच्या अंतरात आहेत. डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या निकषानुसार १५ कि.मी.च्या आत दुसरे कॉलेज देता येत नाही. यासंदर्भात विद्या परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, प्रा. अमरसिंह रजपूत यांनी तक्रार केली होती. याची दखल घेऊन विद्यापीठ प्रशासनाने तातडीची व्यवस्थापन परिषदेची बैठक घेऊन दोन बिंदू कमी केले. व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेला बृहत् आराखडा २५ मे रोजी होणाऱ्या विद्यापीठाच्या अधिसभेत मंजूर केला जाणार आहे.

17 MAY 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तांत्रिक ज्ञानासोबत आशय महत्त्वाचा

## रोहन घोरपडे : डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात न्यूज पोर्टल डिझाईनचे प्रात्यक्षिक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

न्यूज पोर्टल तयार करण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान असून उपयोगाचे नाही, तर त्यासाठी तगडा आशय महत्त्वाचा असावा लागतो, असे प्रतिपादन वेब डिझायनर रोहन घोरपडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये न्यूज पोर्टल डिझाईनिंग विषयावर ते बोलत होते. यावेळी त्यांनी न्यूज पोर्टल कसे तयार केले जाते, त्याचे तपशीलवार प्रात्यक्षिक दाखवले. घोरपडे म्हणाले, आशय व तंत्रज्ञान एकमेकांच्या हातात हात घालून पुढे जात आहे. न्यूज पोर्टलसाठी यूजर कोण आहे, त्याचा सर्वप्रथम विचार व्हावा. तसेच यूजरच्या गरजा लक्षात घेऊन पोर्टलचे डिझाईन करणे आवश्यक आहे. विषय, भाषा, आशय, ऑडिओ, व्हिडीओ कन्टेन्ट, फोटोग्राफी, सादरीकरण तसेच संशोधन यावर नव्या पद्धतीच्या पत्रकारितेमध्ये जास्त भर द्यावा लागेल, असे त्यांनी नमूद केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अभ्यासनामध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या मोहन कांबळे, अमर खोत, पुष्पा पाटील यांचा सत्कार करताना रोहन घोरपडे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव.**
**(छाया : नाज ट्रेनर)**

पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमचा विद्यार्थी मोहन कांबळे याने शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. अमर खोत याने फोटोग्राफीत दिलेले योगदान व पुष्पा पाटील हिने पॉडकास्टमध्ये केलेल्या कामाबद्दल तिघांचा सत्कार करण्यात आला.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. पुष्पा पाटीलने आभार मानले.

पुढारी

# उत्स्फूर्तपणे शिकवण्याची कला आत्मसात करण्यासाठी संशोधन महत्त्वाचे : डॉ. गुरव

कोल्हापूर : उत्स्फूर्तपणे शिकवण्याची कला आत्मसात करण्यासाठी संशोधन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. कसबा बावडा येथील डॉ डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील संशोधन विभागामार्फत आयोजित महाविद्यालयातील शिक्षकांसाठी सरकारी व खाजगी आस्थापनाकडून निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव कसे लिहावे, यासंदर्भात आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. गुरव म्हणाले, निधी देण्यासाठी नियमित शिक्षकच नाही तर लघू उद्योजकांना निधी देण्यासाठी इच्छुक असतात. आंतरशाखीय संशोधन करून समाजाला उपयोगी असे प्रश्न प्रकल्पामध्ये अंतर्भूत केले तर निधी मिळू शकतो. अधिष्ठाता डॉ. अमरसिंह जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ सुनंदा शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ संतोष छेडे, प्रा. एम. जे. पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'बोन्साय कला मन:शांतीसाठी उपयोगी'

कोल्हापूर : बोन्साय कलेमध्ये असलेले गैरसमज दूर करणे महत्त्वाचे आहे. ही कला मन:शांती व ध्यानधारणेसाठी उपयोगी आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ही कला जोपासता येते, असे प्रतिपादन बोन्साय क्लबच्या अध्यक्षा सुनीती देशमुख यांनी केले. शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग, कोल्हापूर बोन्साय क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बोन्साय दिनानिमित्त 'बोन्साय-एक कला जपानी' कला कार्यशाळा झाली. पीपीटीद्वारे बोन्साय कलेसाठी लागणारी कौशल्ये, उपकरणे, नवनवीन पद्धती, प्रकार याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. देशमुख म्हणाल्या, बोन्साय कला ही प्राचीन कला आहे. कलेचे पुरावे चीनमध्ये सापडतात. बौद्ध धर्माबरोबर कलेचा प्रसार होत गेला. जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. कार्यशाळेमध्ये बोन्साय कलेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. डॉ. धनश्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितला. यावेळी कोल्हापूर बोन्साय क्लबचे सचिन बोंगाळे, दीपाली ताइवडे आदी उपस्थित होते. सानिका डोईफोडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

17 MAY 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात प्रात्यक्षिकांतून 'बोन्साय'ची माहिती

**सकाळ वृत्तसेवा**


कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि कोल्हापूर बोन्साय क्लब यांच्यातर्फे जागतिक बोन्साय दिनानिमित्त 'बोन्साय-एक कला जपानी' कार्यशाळा झाली. त्यात प्रात्यक्षिकांद्वारे बोन्साय कलेची माहिती देण्यात आली. बोन्साय झाडांचे प्रदर्शन भरवले.

बोन्साय कला ही अतिशय प्राचीन अशी कला आहे. ही कला मनःशांती आणि ध्यानधारणेसाठी अत्यंत उपयोगी आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ही कला जोपासता येते, असे कोल्हापूर बोन्साय क्लबच्या अध्यक्षा सुनिती देशमुख यांनी सांगितले. त्यांनी बोन्साय कलेसाठी लागणारी कौशल्ये, उपकरणे, नवनवीन पद्धती, प्रकाराची माहिती दिली. बोन्साय कलेची प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये झाडाची निवड, त्याची काटछाट, बांधणी याबाबतची माहिती दिली. प्रात्यक्षिकांमध्ये जेड आणि चिंचेच्या झाडांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी बोन्साय कलेकडे करिअरच्या दृष्टिकोनातून पाहावे. यातून अनेक व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. बोन्साय कलेचा अभ्यासक्रमामध्येही समावेश व्हावा, असे मत डॉ. धनश्री पाटील यांनी व्यक्त केले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, 'विदेशी भाषेबरोबर विदेशी संस्कृती विद्यार्थ्यांना समजावी, असा या कार्यशाळेचा उद्देश होता. सातत्य, संयम आणि निरीक्षण क्षमता यांच्या आधारे बोन्साय कलेवर प्रभुत्व मिळवता येते.' कार्यशाळेला विद्यापीठातील विविध अधिविभागांचे विद्यार्थी, कोल्हापूर बोन्साय क्लबचे सचिन बोंगाळे, दीपाली ताइवडे आदी उपस्थित होते. सानिका डोईफोडे यांनी सूत्रसंचालन केले.

17 MAY 2023
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गेक्कोऐला उपपोटजातीतील दोन नवीन पाली.



गेक्कोऐला उपपोटजातीतील दोन नवीन पाली.

# तमिळनाडूसह आंध्र प्रदेशातून पालींच्या दोन नव्या प्रजातींचा शोध

## संशोधनामध्ये कोल्हापूरच्या अक्षय खांडेकर यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : भारताच्या दक्षिण - पूर्वतटीय सदाहरित वनांमधून गेक्कोऐला उपपोटजातीतील दोन नवीन पालींचा शोध लावण्यात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनामध्ये ईशान अगरवाल, तेजस ठाकरे आणि कोल्हापूरच्या अक्षय खांडेकर यांचा सहभाग आहे.

बोटांच्या वैशिष्ट्यपूर्ण वक्राकार आकारांमुळे ही पाल सर्टोडॅक्टिलस या पोटजातीत मोडते. अंगावरील वैशिष्ट्यपूर्ण रंग, सरासरी छोटा आकार आणि मांडीवरील ग्रंथींचा अभाव यांमुळे या पालींचा समावेश गेक्कोऐला या उपपोटजातीत केला आहे. सर्टोडॅक्टिलस ईरुलाओरम या प्रजातीचा शोध तमिळनाडूच्या कांचीपुरम आणि तिरुवल्लूर या जिल्ह्यांमधून लागला आहे. ईरुला या अदिवासी द्रविडी जमातीवरुन या पालीचे नामकरण 'ईरुलाओरम' असे केलेले आहे. सर्टोडॅक्टिलस रेलिक्टस या प्रजातीचा शोध आंध्र प्रदेशामधील तिरुपती आणि नेल्लोर या दोन जिल्ह्यांमधून लागला आहे. सीमित अनुकूल भूप्रदेशात तगून राहण्यावरुन त्यांचे नामकरण रेलिक्टस या लॅटीन शब्दाने केलेले आहे. अंगावरील रंग आणि आकारांवरुन या दोन्ही पाली एकमेकांपासून आणि उपपोटजातीतील इतरांपासून वेगळ्या आहेत.

गेक्कोऐला ही उपपोटजात भारतीय द्वीपकल्प आणि श्रीलंकेमधे पसरलेली आहे. या उपपोटजातीतील पाली जमीनीवरती वावरतात. जमिनीवर वावरताना समतोल साधण्यासाठी वक्राकार बोटांची त्यांना मदत मिळते. आकर्षक रंगयोजन हे गेक्कोईला या उपपोटजातीतील पालींचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या पाली उष्णकटिबंधीय सदाहरीत वनांमधे सापडतात. पाला-पाचाळ्यांनी व्यापलेल्या जमीनीवर भक्ष्य पकडण्यासाठी या पाली रात्री बाहेर पडतात. छोटे किडे हे त्यांचे प्रमुख खाद्य आहे.

> भारतातील संशोधनाचा कल हा नेहमीच पश्चिम घाटाकडे कललेला आहे. दक्षिण-पूर्व भारतातील पर्वतांवरुन गेल्या काही वर्षांपासून सातत्याने नवीन प्रजाती सापडत आहेत. नव्याने सापडलेल्या दोन प्रजातींमुळे दक्षिण भारतातील उष्णकटिबंधीय सदाहरित वनांचे जैवविविधतेच्या दृष्टीने असणारे महत्त्व अधोरेखित होत आहे.
>
> **- अक्षय खांडेकर**, पीएचडी विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत

# विदेशी भाषा विभागात बोन्साय कलेची प्रात्यक्षिके

## जागतिक बोन्साय दिनानिमित्त विद्यापीठात उपक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि कोल्हापूर बोन्साय क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक बोन्साय दिनानिमित्त 'बोन्साय-एक कला जपानी' या कला कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत बोन्साय कलेविषयी माहिती, बोन्साय कलेचे प्रात्यक्षिक सादर केली. तसेच बोन्साय झाडांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. बोन्साय कला ही अतिशय प्राचीन कला आहे. या कलेचे पुरावे चीनमध्ये सापडतात. बौद्ध धर्माबरोबर या कलेचा प्रसार होत गेला. जपानमध्ये या कलेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे.

बोन्साय कलेमध्ये असलेले गैरसमज दूर करणे महत्त्वाचे आहे. ही कला मन:शांती आणि ध्यानधारणेसाठी अत्यंत उपयोगी आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ही कला जोपासता येते. यानंतर त्यांनी पीपीटीद्वारे बोन्साय कलेसाठी लागणारी कौशल्ये, उपकरणे, नवनवीन पद्धती, प्रकार याबद्दल कोल्हापूर बोन्साय क्लबच्या अध्यक्षा सुनिती देशमुख यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यशाळेमध्ये बोन्साय कलेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. धनश्री पाटील म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी बोन्साय कलेकडे करिअरच्या दृष्टीकोनातून पहावे. यातून अनेक व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. बोन्साय कलेचा अभ्यासक्रमामध्येही समावेश व्हावा. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, विदेशी भाषेबरोबर विदेशी संस्कृती विद्यार्थ्यांना समजावी यासाठी अशा कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन केले जाते.